टेक्स्टबुक कमिटीनें मंजूर केले

जंजिरा संस्थान सरकारनें टेक्स्ट म्हणून मंजूर केलेलें.

सदानंद यशवंत पोतदार-कृत

पाठात्मक

कुलाबा-भूवर्णन

[प्राथमिक इयत्ता २ व ३ करितां]

सन १९३१

किंमत २।। आणे

रा संस्थान सरकारनें टेक्स्ट-बुक म्हणून मंजूर केलेलें

प्राथमिक दुसऱ्या व तिसऱ्या इयत्तांकरितां

पाठात्मक

कुलाबा भूवर्णन

लेखक व प्रकाशक

सदानंद यशवंत पोतदार,

शिक्षक, मुरूड मराठी स्कूल नं. १

मुद्रक—लक्ष्मण भाऊराव कोकाटे,

'हनुमान' प्रेस, ३०० सदाशिव, पुणें नं. २

[हें पुस्तक सन १९२७ च्या १ ल्या जंजिरा प्रेस ॲक्टाप्रमाणें नोंदिलें असे.]

द्वितीयावृत्ति—सन १९३१

थोरामोठ्यांचे बोल

श्रीयुत स. य. पोतदार यांस—

तुमच्या “ **पाठात्मक कुलाबा भूवर्णना** ” ची हस्तलिखित प्र वाचून पाहिली. यांतील विषयाची रचना नवीन पद्धतीस अनुसरून असून भाषा ोपी च संभाषणात्मक आहे. त्यामुळें हें **पुस्तक विद्यार्थ्यांना अत्यंत उ युक्त होईल** असें वाटतें. माहिती भरपूर असून नवीन पद्धतीनें दिल्यामुळें **विषय मनोरंजक झाला आहे. टेक्स्ट बुक म्हणून ह्या पुस्तकाचा फार उपयोग होईल** असें वाटतें.

कँप रोहा,
ता. १७।११।२९.

डी. डी. तर्खडकर, बी. ए.,
सीनिअर अ. डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्ट ,
जिल्हा—कुल बा.

अनुक्रमणिका

प्रस्तावना

नवीन सुधारलेल्या अभ्यासपत्रकाप्रमाणें दुसऱ्या इयत्तेस तालुक्याचा व तिसऱ्या इयत्तेस जिल्ह्याचा भूगोल नेमिला आहे. त्याकरितां **जरूर ती सर्व माहिती या पुस्तकांत सरळ व सुबोध अशी दिली आहे. यांतील बहुतेक सर्व माहिती घोकंपट्टी न करितां, नकाशाच्या साहाय्यानें सहज तयार करितां यावी अशी रचना केली आहे.** या इयत्तांसाठीं कांहीं पुस्तकें आज सुरू आहेत; त्यांहून ह्या पुस्तकांत काय विशेष आहे, हें जे पालक व शिक्षक हें पुस्तक वाचून पाहातील, त्यांच्या लक्षांत सहज येईल. त्यांना हें पुस्तक लिहिण्याचा उद्देश सांगण्याचें कारण नाहीं.

हें पुस्तक वाचून पाहून तें सुधारण्याविषयीं जे कोणी उपयुक्त सूचना करतील त्यांचा मी फार अभारी होईन.

रा. **रा. वि. मराठे** (उरण), रा० **शं. रा. मोहरे** (कर्जत) व आणखी कांहीं **सद्गृहस्थ** यांनीं माहिती पुरविली. चौल शाळेंतील शिक्षक रा. **न. त्र्यं. जोशी,** मरूड मराठी शाळेचे हेडमास्तर मे० **ग. मो. जोशी,** मरूड हायस्कूलचे हेडमास्तर मे० **स. आ. कुळकर्णी,** बी. ए, कुलाबा जिल्हांतील एज्यु० सुपरवायझर मे० **जी. व्ही. गोईलकर** व मे० **एस्. जी. कामत,** बी. ए., यांनीं या पुस्तकाची हस्तलिखितें वाचून उपयुक्त सूचना केल्या.

वरील सर्व गृहस्थांचा आणि हें पुस्तक लिहिण्याच्या कामीं ज्या ज्या मराठी व इंग्रजी ग्रंथांचा उपयोग झाला त्या त्या ग्रंथकारांचा मी फार आभारी आहें.

मे० **डी. डी. तखडकर,** बी. ए., सीनिअर अ. डेप्युटी एज्यु० इन्स्पेक्टर जिल्हा कुलाबा यांनीं या पुस्तकाची हस्तलिखित प्रत वाचून उपयुक्त सूचना केल्या व आपला **अभिप्राय लिहून दिला,** आणि **जंजिरा संस्थान सरकारनें हें पुस्तक टेक्स्ट म्हणून चालू केलें** याबद्दल **मी या उभयतांचा अत्यंत ऋणी आहे.**

दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

ही आवृत्ति पहिलीचें पुनर्मुद्रण आहे.

जंजिरा–मुरूड,
ता. १७।१।३१.

सादानंद यशवंत पोतदार.


पाठ पहिला.

दिशा—हें टेबल पाहा. हें तुमच्या कोणत्या बाजूला आहे ? हें एकाच्या उजव्या बाजूला तर दुसऱ्याच्या डाव्या बाजूला आहे. तिसऱ्या मुलाच्या पुढें तर चवथ्याच्या मागें आहे. यावरून डावी बाजू व मागें पुढें या शब्दांनीं, एकादी जागा कोठें आहे याबद्दल स्पष्ट बोध होत नाहीं. परंतु तो होणें अत्यंत जरूरीचें आहे. यासाठीं ज्यावर आपणांस नक्की बाजू ठरवावयाची असेल तें ठिकाण कधींही न बदलणारें असें असलें पाहिजे. अशीं न बदलणारीं ठिकाणें सूर्य उगवण्याची बाजू व मावळण्याची बाजू हीं आहेत. कारण सूर्य दररोज नेमानें ठरलेल्या बाजूला उगवतो व मावळतो. ह्या दोन जागा नक्की धरून त्यांवरून इतर बाजू ठरविल्या आहेत. त्या बाजूंवरून कोणताही पदार्थ अगर जागा दुसऱ्या एकाद्या पदार्थाच्या किंवा जागेच्या कोणत्या बाजूस आहे, हें निश्चित सांगतां येतें.



सूर्य उगवण्याची व मावळण्याची बाजू आणि त्या निश्चित धरून त्यावरून ठरविलेल्या इतर बाजू ह्या सर्वांस **दिशा म्हणतात.** सूर्य उगवतो त्या बाजूस **पूर्व दिशा** व मावळतो त्या बाजूस **पश्चिम दिशा** म्हणतात. पूर्वेला उजवा हात करून उभें राहिलें कीं समोर

उत्तर, मागें **दक्षिण** व डाव्या हाताकडे **पश्चिम** दिशा समजावी. या चार दिशांवरून सांगितलेली माहिती फार ढोबळ होते, म्हणून या चार दिशांमध्यें आणखी चार दिशा मानल्या आहेत.



त्यांचीं नांवें **आग्नेय, नैर्ऋत्य, वायव्य** व **ईशान्य.** शिवाय **वरची बाजू** (उर्ध्व) व **खालची बाजू** (अधर). मिळून एकंदर दहा दिशा मानलेल्या आहेत.

सूर्याच्या उदयास्तावरून दिशा फक्त दिवसां ठरवितां येतात. परंतु रात्रीं त्या कशा ठरवाव्या हें आतां पाहूं. रात्रीं आकाशांत **ध्रुवतारा** दिसतो. तो तारा अढळ म्हणजे कधींही जागा न सोडणारा असा आहे. तो ज्या दिशेस दिसतो ती **उत्तर** दिशा होय. तो नेहमीं रात्रीं दिसतो व आपल्या गांवांतून तो दररोज एकाच उंचविर दिसतो. याची ठराविक दिशा उत्तर असल्यामुळें रात्रींच्या वेळीं त्यावरून बाकीच्या दिशा ठरवितां येतात. (विद्यार्थ्यांस रात्रीं फिरावयास नेऊन ही माहिती देतां येईल.)

दिशा दाखविणारें एक यंत्र आहे. तें पाहिलें कीं सर्व दिशा समजतात. हें जवळ असलें कीं सूर्य, नक्षत्रें वगैरे कांहीं पाहावें लागत नाहीं. या यंत्रांस **होकायंत्र म्हणतात.** (प्रत्यक्ष असल्यास दाखविणें) या होकायंत्रांत घड्याळाच्या काट्यासारखा एक काटा

असतो. हा सहज हालेल अशा रीतीनें एका हालत्या बैठकीवर ठेवलेला असतो. तो स्थिर होतांच दक्षिणोत्तर होतो. मग काट्याच्या टोकाखालीं बरोबर येतील अशीं उत्तर व दक्षिण हीं दोन नांवें लिहून मग त्यांवरून इतर दिशांचीं नांवें लिहिलेलीं असतात. हें बरोबर घेतलें कीं वाटेल त्या ठिकाणीं व वाटेल त्या वेळीं दिशा पाहातां येतात.

नकाशा—पदार्थ, प्राणी वगैरेंची जी आकृति तिला चित्र म्हणतात; आणि गांव, तालुका व जिल्हा वगैरे प्रदेशांची जी आकृति तिला **नकाशा म्हणतात.** जितका प्रदेश असेल तितका कागद मिळणार नाहीं. त्यामुळें प्रदेशाइतकाच नकाशा कागदावर काढतां येणें शक्य नाहीं. यासाठीं नकाशा काढतांना अमुक मैलास अमुक इंच (जसें, दहा मैलांस एक इंच) असें प्रमाण धरून तो काढतात. या प्रमाणास **स्केल** असें म्हणतात. याप्रमाणें वाटेल त्या प्रदेशाचा लहानमोठा नकाशा तयार करतां येतो. **नकाशाची वरची बाजू उत्तर दिशा असते.**

एकाद्या प्रदेशाचें स्वरूप, त्यांतील गांवें, नद्या, खाड्या, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जाण्याचे मार्ग, कोठें काय आहे व तें किती आहे हें कसें ओळखावें हें नकाशावरून कळतें.

अभ्यास--(१) दिशा ओळखण्याच्या सर्व रीती सांगा. (२) प्रत्येकीचा उपयोग केव्हां करावा ? (३) नकाशा म्हणजे काय ? (४) त्याचा उपयोग सांगा.


पाठात्मक कुलाबा भूवर्णन

भाग १ ला

सामान्य वर्णन


पाठ दुसरा


कुलाबा जिल्ह्याची ओळख— तुम्हीं कोणत्या तालुक्यांत राहतां ? (कु. जि. नकाशा दाखविणें) या नकाशांत तुमचा तालुका दाखवा. या तुमच्या तालुक्याची माहिती तुम्हांला झालेली आहेच. तुमचा तालुका व त्याच्या जवळचे कांहीं तालुके मिळून हा **कुलाबा जिल्हा** झाला आहे. या आपल्या जिल्ह्याची माहिती आज आपण मिळवूं या. हें अलिबाग पाहा. हें आपल्या जिल्ह्याचें मुख्य शहर आहे. येथून जवळ हा **कुलाबा किल्ला** आहे. याच किल्ल्यावरून



कुलाबा किल्ला.

आपल्या जिल्ह्याला " **कुलाबा जिल्हा** " हें नांव पडलें आहे.


ठाणे जिल्हा
मुंबई
घारापुरी
न्हावे
उलवे
तळोजे
आगोटे
पनवेल
गाढी नदी
पळस्पे
शेवे
मोरे
उरण
मुळेखंड
कर्जे
चिरनेर
कर्नाळा
आपटे
साई
पाताळगंगा न.
माणिकगड
कणे
सागरगड
मांडवे
सासवने
आवास
किहीम
थळ
सारळ
रेवस
आगरसुरे
नारंगी
कनकेश्वर
धरमतर
शहाबाज
पोयनाड
अलीबाग
कुलाबा किल्ला
खांदेरी
उंदेरी
नागांव
चौल
रेवदंडा
कोरलई
वाशी
वडखळ
पेण
पाटणोली
वरसई
सावरोली
आंबेघर
डोलवली
सोनगिरी
भोगावती न.
भोगेश्वर
मिऱ्याडोंगर
कासू
नागोठणे
उन्हेरे
जांभूळपाडा
नाडसूर
सिध्देश्वर
सरसगड
पाली
माथेरान
मांडोपाडा
चौक
नेरळ
मामिवली
चिंचवली
कोल्हारे
कर्जत
कडाव
वैजनाथ
आंबिवली
दहिवली
भिवपुरी
पळसदरी
कोंडाणे
राजमाची
बोरघाट
खालापूर
जांबरुंग
खोपवली
आडोशी
पुण्याकडे
भीमाशंकर
कोथळीगड
तपशील.
डोंगर


नकाशा
जिल्हा कुलाबा
(स.य. पोतदार कृत)
पाठात्मक भूवर्णन
मोटारी
नदी
आगबोटीचा मार्ग
रोहे
अवचितगड
अष्टमी
कोलाड
धाटाव
घोसाळे
जंजिरा
मुरुड
मांदाड
इंदापूर
तळे
खरवली
मोर्बा
माणगांव
गोरेगांव
निजामपूर
बोरवाडी
रायगड
म्हसळे
दासगाव
महाड
पोलादपूर
बिरवाडी
प्रतापगड
सावित्री नदी
हरेश्वर
बाणकोट
श्रीवर्धन
जि ल्हा र त्ना गि री
C.S.P.P.

मर्यादा—प्रथम या जिल्ह्याच्या कडेला कोणते प्रदेश आहेत ते आपण पाहूं. तुमच्या जिल्ह्याचा नकाशा हा तुमच्या समोर आहे. त्याच्याकडे पाहा. याच्या उत्तरेस–ठाणें जिल्हा व मुंबई बंदर आहे. पूर्वेस–पश्चिम घाट (सह्याद्रि), भोर संस्थान आणि पुणें व सातारा हे जिल्हे; दक्षिणेस–बाणकोटची खाडी व पलीकडे रत्नागिरी जिल्हा; आणि पश्चिमेस–जंजिरा संस्थान व अरबी समुद्र आहे.

क्षेत्रफळ—आपआपल्या फूटपट्ट्या घेऊन या नकाशाची लांबी-रुंदी मोजा; व त्याखालीं प्रमाण दिलें आहे त्यावरून मैल करा. या जिल्ह्याची दक्षिणोत्तर लांबी ७५ मैल व पूर्वपश्चिम रुंदी १५ ते ३० मैल आहे. लांबी व रुंदी यांच्या गुणाकारास **क्षेत्रफळ** म्हणतात. या जिल्ह्याचें क्षेत्रफळ २१६९ चौ. मैल आहे

उंच व सपाट प्रदेश—आतां आंतील भाग पाहूं. हा उठावाचा नकाशा पाहा. याच्या पूर्व बाजूस दक्षिणोत्तर असा एक **मोठा पर्वत** दिसत आहे. पूर्व–पश्चिम असे हे पुष्कळसे **सरळ व उंच डोंगर** पाहा. दक्षिण व उत्तर दिशांना या **लहान लहान डोंगरांच्या** रांगा आहेत. शिवाय हे **उंच उंच सुळके** पाहा. यावरून हा जिल्हा **डोंगराळ** आहे हें तुम्हांस दिसून येईल. हा समुद्रकाठचा प्रदेश पाहा. येथें डोंगर वगैरे दिसत नाहींत. अशा प्रदेशाला **सपाट प्रदेश** म्हणतात. हा समुद्रकाठापासून तीन चार मैल रुंदीचा आहे.

अभ्यास—(१) आपल्या जिल्ह्याला कुलाबा हें नांव कशावरून पडलें ? (२) या जिल्ह्याच्या कडेला कोणते प्रदेश आहेत ? (३) येथील उंच व सपाट प्रदेशांविषयीं तुम्हांस काय माहिती आहे ? (४) यावरून तुम्हांस कोणती गोष्ट कळून येते ?

पाठ तिसरा

विभाग—कोणतें स्थळ कोठें आहे हें निश्चित करण्यासाठीं, लोकसंख्या, उत्पन्न, धंदे यांची कागदोपत्रीं नोंद करण्यासाठीं व राज्य-व्यवस्था वगैरेंकरितां खेड्यांचे, शहरांचे व जिल्ह्यांचे भाग व विभाग पाडतात. त्याप्रमाणें कुलाबा जिल्ह्याचेही भाग व विभाग पाडिले आहेत. तेव्हां ते भाग कोणकोणते आहेत त्याची माहिती करून घेऊं.

लहान वस्तीच्या ठिकाणास **खेडें** म्हणतात, व मोठ्या वस्तीच्या ठिकाणास **गांव** म्हणतात. शेंसव्वाशें गांवांचा जो भाग करितात त्यास **तालुका** म्हणतात. या जिल्ह्यांत एकंदर गांवें व खेडीं १६२७ आहेत. त्यांचे [१]**अलिबाग**, [२] **रोहें**, [३] **माणगांव**, [४] **महाड**, [५] **पनवेल**, [६] **कर्जत** व [७] **पेण** असे सात तालुके केले आहेत. तीनचार तालुक्यांचा जो भाग करितात त्यास **प्रांत** म्हणतात. असे प्रांत या जिल्ह्यांत दोन आहेत. त्यांना **दक्षिण प्रांत** व **उत्तर प्रांत** अशीं नांवें आहेत. पहिले चार तालुके दक्षिण प्रांतामध्यें व बाकीचे तीन तालुके उत्तर प्रांतामध्यें आहेत.

शिवाय **जंजिरा संस्थान** व भोर संस्थानांतील **सुधागड तालुका** हाही प्रदेश आपल्या जिल्ह्यांत मोडतो. (नकाशा पाहा).

पर्वत—या जिल्ह्यांत **एकच पर्वत आहे**. तो आपण उठावाच्या नकाशांत पूर्वेकडे पाहिला. त्यास **सह्यपर्वत** म्हणतात. त्यांतून देशावर जाण्यायेण्यास अनेक वाटा आहेत. त्यांना **घाट म्हणतात**. त्यांपैकीं कर्जत तालुक्यांत **बोरघाट** व महाड तालुक्यांत **वरंधा** व **फिटजिराल्ड** घाट हे प्रसिद्ध आहेत. त्यांतून देशावर जाण्यायेण्यास गाडीरस्ते आहेत. सह्याद्रीच्या पूर्वेकडे जो प्रदेश आहे त्यास **देश**

म्हणतात, व पश्चिमेकडे जो प्रदेश आहे त्यास **कोंकण म्हणतात.** आपला जिल्हा कोंकणांत आहे.

अभ्यास—(१) एथील भाग व विभाग सांगा. (२) ते कां पाडतात? (३) एथील प्रसिद्ध घाट कोणते? (४) त्यांचा उपयोग सांगा.

पाठ चवथा

नद्या—एथील सर्व नद्यांचा उगम पूर्वेकडे सह्याद्रीच्या मुख्य रांगेंत अथवा त्याच्या शाखांत होतो; त्या पश्चिमेकडे समुद्रास मिळतात. सह्याद्रीवर पाऊस पुष्कळ पडतो. शिवाय एथील नद्या ज्या प्रदेशांतून वाहतात तो उतरता आहे. त्यामुळें या जिल्ह्यांतील नद्यांना पावसाळ्यांत लौकर मोठे पूर येतात. एथील सर्व नद्या पूर्वी उन्हाळ्यांत आटत असत; परंतु हल्लीं टाटा कंपनीचें पाणी सुटत असल्यामुळें कांहीं नद्यांना बाराही महिने पाणी असतें. एथील प्रसिद्ध नद्या व त्यांची माहिती आपण तालुकावर्णनांत मिळवूं.

हवा—पनवेल ते महाडपर्यंत सरळ ओळ काढिली असतां पूर्वेकडे जो प्रदेश राहातो त्याला समुद्राची हवा मिळत नाहीं. प्रदेश डोंगराळ व जंगली म्हणून तेथील **हवा कोरडी** (विषम) आहे. कोरड्या हवेंत उन्हाळा व हिवाळा हे कडक भासतात. हा कडकपणा पूर्वेकडे (समुद्रापासून दूरच्या प्रदेशांत) वाढत जातो. पश्चिमेकडील भागांत जंगल कमी, जमीन सपाट, हवा मोकळी, बागायती फार, जागजागीं नद्या व खाड्या, यामुळें तेथें नेहमीं **दमट हवा** असते. दमट हवेंत उन्हाळा व थंडी या दिवसांत फारसा फरक पडत नाहीं. त्यामुळें अशा हवेला सम म्हणजे न बदलणारी हवा असें म्हणतात.

कोरडी व थंड हवा आरोग्याला चांगली असते.

पाऊस—ज्येष्ठापासून एथें नैर्ऋत्येकडून वारे वाहात असतात. हे वारे समुद्रावरून येतात, यामुळें त्यांचेबरोबर पाण्याची वाफ (ढग) असते. ती सह्याद्रीमुळें अडली जाऊन तेथील थंड हवेमुळें जड होते आणि पावसाच्या रूपानें खालीं पडते. म्हणून हे वारे वाहावयास लागले म्हणजे येथें पाऊस पडण्यास आरंभ होतो. समुद्रावरून येणारे हे वारे या जिल्ह्यांतून जात असल्यामुळें येथें सरासरी (समुद्रकिनाऱ्यास ९० ते घाटांत १३० इंच) ८८ इंचापर्यंत पाऊस पडतो. झाडीच्या ठिकाणीं हवा थंड असते. त्यामुळें **समुद्रकाठापेक्षां डोंगरावर पाऊस जास्त पडतो.**

आश्विन महिन्यापासून हे वारे बंद होऊन ईशान्येकडील वारे सुरू होतात. हे वारे जमिनीवरून येतात. त्यामुळें त्यांच्याबरोबर पाण्याची वाफ नसते. या दिवसांत एथें पाऊस पडत नाहीं याचें कारण आतां तुमच्या लक्षांत आलें असेलच. [कां ?]


अभ्यास—(१) एथील नद्यांविषयीं तुम्हांस असलेली माहिती सांगा. (२) सम व विषम हवा म्हणजे काय ? (३) उत्तम हवा कोणती ? (४) कारण ? (५) पावसाबद्दल तुम्हांस काय माहिती आहे ?

पाठ पांचवा

—:०:—

पिकें—पाऊस जास्त पडत असल्यामुळें एथें **भाताचें उत्पन्न चांगलें होतें.** पेण, पनवेल या तालुक्यांत खाऱ्या जमिनी आहेत. त्यामुळें तिकडे **खारें भात** पिकतें. तें मोलमजुरी करणाऱ्या लोकांस फार आवडतें. रेताड जमीन, दमसर हवा व भरपूर पाणी यामुळें समुद्रकाठीं **नारळ** व **सुपारी** यांचें उत्पन्न होतें. उतरत्या भागीं

(विशेषतः पूर्वभागांत) वरी, नाचणी, तीळ व उडीद, जंगलांत



शेतकरी

हिरडे, लाकूड [सागवानी व जळाऊ] आणि समुद्रकिनारीं **सुकी मासळी** यांचें उत्पन्न होतें. पेण, पनवेल एथें मिठागरें आहेत. त्यामुळें तेथें **मिठाचें उत्पन्न** बरेंच होतें.

झाडें---समुद्रकिनाऱ्यास नारळ, सुपारी, केळीं, अननस व जंगलांत साग, ऐन व आंबा यांची लागवड बऱ्याच प्रमाणांत आहे. रान दाट आहे.

प्राणी---शेतीकरितां बैल, व रेडे सर्वत्र पाळतात. झाडी दाट आहे. त्यामुळें अलीबाग तालुक्यांत महान व बेलोसीच्या जंगलांत वाघ, सांबर हीं जनावरें आहेत. कर्जत तालुक्यांत खांडसच्या अरण्यांत बिबळे वाघही कधीं कधीं भटकतांना आढळतात. **कोल्हे व रानडुकरें** हे प्राणी जंगलांत सर्वत्र आहेत.

अभ्यास--(१) महत्त्वाचीं पिकें सांगा. (२) कारण? (३) जंगलांत कोणतें उत्पन्न होतें? (४) कारण? (५) एथें कोणकोणते प्राणी आहेत?

पाठ सहावा

लोक-आतां आपल्या जिल्ह्यांत कोणकोणंत्या जातीचे लोक आहेत, त्यांचे धंदे कोणते आहेत, त्यांची भाषा, शिक्षण वगैरेंबद्दल या पाठांत विचार करूं.

या जिल्ह्यांत एकंदर सुमारें **साडे पांच लक्ष लोक** आहेत. त्यांत हिंदू सव्वापांच लक्ष, मुसलमान अठ्ठावीस हजार, ज्यू सत्राशें, पोर्तुगीज पंधराशें, जैन चौदाशें व पारशी तीनशें आहेत. (हे आकडे सन १९२१ च्या खानेसुमारीचे आहेत.) हिंदूंमध्यें ब्राह्मण, प्रभु, माळी, आगरी, कोळी व ठाकूर या जातींचा भरणा जास्त आहे. **बहुतेक लोक (शें. अठ्ठ्याण्णव) मराठी बोलणारे आहेत.** पोर्तुगीज व उर्दू भाषाही थोड्या प्रमाणांत चालते. बंदरें, खाड्या वगैरे **जलमार्ग** (पाठ ९ मध्यें पाहा) **सोईचे** आहेत. त्यामुळें समुद्रकिनारीं **दाट वस्ती** आहे. उष्ण हवेंत मनुष्यास जास्त श्रम करवत नाहींत व त्यांच्या अंगांत हुशारीही राहात नाहीं. आपल्या जिल्ह्यांतील बहुतेक भागांत हवा सम आहे. त्यामुळें एथील लोक उद्योगी आहेत. बहुतेक लोक शेती व बागायत करणारे आहेत. पेण व पनवेल तालुक्यांत मीठ तयार करणारे लोक आहेत. शिवाय नोकरी करणें, व्यापार करणें, मासे मारणें वगैरे धंदे करणारे लोकही बऱ्याच प्रमाणांत आहेत.

पूर्वी सर्व जातींच्या लोकांना शिक्षण देण्याची व्यवस्था एथें नव्हती; परंतु एथें **इंग्लिशांचें राज्य झाल्यापासून** इंग्लिश, मराठी व उर्दू

हें शिक्षण सर्वांस मिळावें अशी सोय सरकारनें केली आहे. बहुतेक तालुक्यांच्या मुख्य शहरीं स्वतंत्र **इंग्रजी शाळा** आहेत. त्यांत (इंग्लिश) इयत्ता ७ (मॅट्रिक) पर्यंतचें शिक्षण मिळतें. मोठमोठ्या अशा कांहीं गांवांतून **इंग्रजी वर्ग मराठी शाळेस जोडलेले आहेत. मराठी व उर्दू शिक्षणाची सोय** बहुतेक सर्व मोठमोठ्या गांवांत आहे. त्यामुळें या जिल्ह्यांत शिक्षणाचा प्रसार दिवसेंदिवस फार होत आहे. लोकलबोर्डे, म्युनिसिपालिट्या वगैरे संस्थांच्या द्वारें **प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचें** करण्याबद्दचे प्रयत्न चालू आहेत.


लोकांच्या आरोग्याकरितां ठिकठिकाणीं दवाखाने उघडण्यांत आले आहेत. त्यांतून लोकांना मोफत औषधें देण्याची सोय केलेली आहे.

अभ्यास—(१) लोकांच्या जाती व त्यांचे धंदे सांगा. (२) दाट वस्ती कोठें आहे ? (३) कां ? (४) एथील शिक्षणाच्या सोयी सांगा. (५) लोकांच्या भाषा कोणत्या ?

पाठ सातवा

व्यापार—आपल्या जिल्ह्यांत कोणकोणता व्यापार चालतो त्याजबद्दलची माहिती आज आपणांस मिळवावयाची आहे. तथापि व्यापार म्हणजे काय हें आपण प्रथम समजावून घेतलें पाहिजे. व्यापार **म्हणजे माल विकणें व विकत घेणें**. कोणत्याही देशांतील लोकांस कांहीं जिन्नस परगांवांहून आणावे लागतात. तसेंच आपल्या देशांत होणाऱ्या जिनसांपैकीं कांहीं इतर गांवीं पाठवावे लागतात. हाच देशाचा व्यापार होय. आपल्या जिल्ह्यांतून जाणारा माल कोणता असतो त्याची माहिती प्रथम मिळवूं.

निर्यात (जाणारा) माल— शेतीचें व बागायतीचें उत्पन्न फार होतें. त्यामुळें एथून फळें, भाजीपाला, **नारळ, सुपारी** व **भात** हे जिन्नस मुख्यतः बाहेर जातात. कोळी लोक समुद्रांतील मासे पकडून सुकवितात व ते बाहेरगांवीं पाठवितात. पेण, पनवेल एथील मिठागरांतून मीठ रवाना होतें. जंगलांतून निघणारें लाकूड,



मिठागरें

गवत व लाकडापासून उत्पन्न होणारा कोळसा वगैरे मालही बऱ्याच प्रमाणांत एथून रवाना होतो.

आयात (येणारा) माल——आतां येणारा माल कोणता असतो तें पाहूं. आपण रोज भांडीं वापरतों तीं आपल्याकडे होत नाहींत. तीं पुणें, नाशिक इकडून येतात. तुम्हांला लागणारे कागद, शाई वगैरे स्टेशनरी सामान मुंबईकडून येतें; तसेंच आपल्या जिल्ह्यांतील एवढ्या मोठ्या वस्तीस लागणारें कडधान्य, तेल, तूप, चहा-


साखर, कापड, सोनें, धातूंचे पत्रे, मसाल्याचे जिन्नस वगैरे माल बाहेरगांवांहून येतो. तो आपल्याकडे होत नाहीं. अशा तऱ्हेनें एथून कच्चा म्हणजे आपोआप उत्पन्न होणारा माल रवाना होतो, व पक्का म्हणजे ज्याच्यावर मनुष्यानें आपली कामगिरी खर्च केली आहे असा माल एथें येत असतो.

अभ्यास—[१] व्यापार म्हणजे काय ? [२] एथील आयात माल सांगा. [३] तो कोणत्या स्वरूपांत असतो ? [४] कारण ? [५] एथील निर्यात माल सांगा.

पाठ आठवा

व्यापारी मार्ग— आपल्या जिल्ह्यांत कोणकोणता व्यापार चालतो याची माहिती तुम्हांला झाली. आतां हा व्यापार कोण-कोणत्या मार्गानें चालतो याजबद्दलची माहिती होणें जरूर आहे. **सडका, खाड्या व रेल्वे** अशा तीन मार्गांनीं एथील व्यापार चालत असतो. या पाठांत आपण फक्त जमिनीवरील रस्त्यांची माहिती मिळवूं.

मोटारचे रस्ते—या नकाशाकडे पाहा. यांत मोटारी नियमित-पणें ज्या रस्त्यांना चालू आहेत ते रस्ते प्रथम पाहूं. [१] हा पनवेल ते ठाणें रस्ता पाहा. हा कामोटें, तळोजें यावरून ठाण्याकडे गेला आहे. [२] पेण, आंबेघर, शिरोळी, मढ, खोपोली यांवरून पुण्या-




मोटार

कडे गेला आहे. [३] अलिबाग, आगरसुरें, सारळ, यावरून

रेवसपर्यंत गेला आहे. [४] धरमतर, डोलवली, नागोठणें, सुकेळ-खिंड, इंदापूर, माणगांव, दासगांव, महाड, पोलादपूर यांवरून रत्नागिरीकडे गेला आहे.

आगगाडीचे रस्ते– आतां आगगाडींतून कोणकोणत्या मार्गानें



जातां येतें तें पाहूं. जी. आय. पी. (ग्रेट इंडियन पेनिन्शुला) रेल्वे–या रेल्वेचा मुंबई–पुणें फाटा कर्जत तालुक्यांतून नेरळ, चिंच-वली, कर्जत, पळसदरी हीं स्टेशनें करीत पुण्याकडे गेला आहे. याला दोन फाटे फुटतात. एक फाटा नेरळ ते माथेरानपर्यंत गेला आहे, व दुसरा कर्जत, पळसदरी, डोलवली हीं स्टेशनें करीत खोपवलीस गेला आहे.

मुंबई ते पुणें इकडे सध्यां **विजेवर चालणाऱ्या गाड्या** सुरू झाल्या आहेत. नेरळ ते माथेरान, व कर्जत ते खोपवली हे दोन मार्ग **पावसाळीं बंद** असतात. **दिवें ते दासगांवपर्यंतही रेल्वे** होईल असा अंदाज आहे.

साधे रस्ते—खेडेगांवांतील व्यापार बैलगाड्यांतून व माणसाच्या वाहातुकीनें चालतो. असे पुष्कळसे मार्ग सध्यां सुधारलेले आहेत.

अभ्यास—[१] धरमतर एथें मोटारींतून बसून महाडास गेल्यास वाटेंत कोणते गांव लागतील ? [२] जमिनीवरील प्रसिद्ध व्यापारी मार्ग कोणते ? [३] माथेरान ते पुण्यापर्यंतचा प्रवास कोणकोणत्या मार्गानें करतां येईल ? [४] अलिबाग ते रेवसपर्यंतच्या वाटेंत कोणते गांव लागतील ?


पाठ नववा

जलमार्ग— जमिनीवरील रस्त्यांची माहिती मिळविली. आतां समुद्रांतील रस्ते कोणकोणते आहेत ते पाहूं. समुद्रकाठचा व्यापार **खाड्या व बंदरें** यांमधून जहाजांनीं व बोटींनीं चालतो. असे मार्ग खालील होत—

खाड्या—समुद्राचें पाणी नदीच्या मुखांत जेथपर्यंत जातें तेथपर्यंतच्या नदीच्या भागास खाडी म्हणतात. एथें उलवें, अष्टें, नागोठणें, रोहें, मांदाड व महाड या मोठ्या खाड्या आहेत.

बंदरें—समुद्राच्या कडेला बोटी, गलबतें वगैरे लावण्याचें जें सोईचें ठिकाण त्यास बंदर म्हणतात. थळ, रोहें, मांदाड, गोरेगांव व महाड हीं एथील प्रसिद्ध बंदरें आहेत.

आगबोटीचीं बंदरें—तुमच्यापैकीं बहुतेकांनीं आगबोटींतून प्रवास केला असेल. तेव्हां ती आगबोट आपल्या जिल्ह्यांत कोणकोणत्या ठिकाणीं थांबते त्याची माहिती आतां मिळवूं. या जिल्ह्यांत (१) **मुंबई ते उलवें**, (२) **मुंबई ते धरमतर** व (३) **मुंबई ते बाणकोट** असे आगबोटीचे तीन मार्ग आहेत. या मार्गांत त्यांना खालील बंदरें लागतात. (१) मुंबई ते उलवें मार्ग—उरण, मोरें, घारापुरी, शेवें, न्हावें व उलवें. (२) मुंबई ते धरमतर मार्ग—मांडवें, करंजें, रेवस व धरमतर. (३) मुंबई ते बाणकोट मार्ग—अलिबाग, रेवदंडा, जंजिरा, श्रीवर्धन व हरेश्वर. हरेश्वर ते दासगांव व धरमतर ते नागोठणें इकडे **लहान बोटी** चालू आहेत.



आगबोट

खाड्या, नद्या, बंदरें वगैरे **जलमार्ग संथ व खोल** आहेत. शिवाय ते **जमिनींत दूरवर गेलेले** आहेत; त्यामुळें बोटी, पडाव, वगैरेंना खाडीच्या तोंडाशीं **निवाऱ्याची जागा** सापडते. एकंदरींत आपल्या जिल्ह्यांत **प्रवासाचीं साधनें चांगलीं आहेत.** त्यामुळें कोणत्याही ठिकाणीं जाण्याला अगर दुष्काळाचें निवारण करण्याला **फारसे श्रम** पडणार नाहींत हें तुमच्या ध्यानांत येईलच.

अभ्यास–[१] उरणें एथें जहाजांत बसून दासगांवपर्यंत गेल्यास वाटेंत लागणारीं बंदरें व खाड्या सांगा. [२] मोरें ते श्रीवर्धनपर्यंतचा प्रवास कसकसा करावा? [३] बोटीचे मार्ग सांगा. [४] मुंबईहून पेणला जावयाचें असल्यास कोणत्या मार्गानें जावें?

पाठ दहावा

राज्यव्यवस्था—मुलांनो, तुमच्या घरची व्यवस्था कोण पाहातो? आईबाप. त्याचप्रमाणें गांव, तालुका व जिल्हा यांतील कामें सुरळीत चालून रयतेस सुख व्हावें म्हणून सरकारनें कांहीं अधिकारी नेमलेले असतात. तेव्हां हे अधिकारी कोणकोण असतात व कोणकोणतीं कामें करितात याबद्दलची माहिती आपण मिळवूं.

गांवकामगार

प्रत्येक गांवांत **पाटील, तलाठी** व **वेसकर** असे तीन मुख्य कामगार असतात.

पाटील—गांवांत स्वच्छता व शांतता राखणें, जन्ममृत्यूची नोंद ठेवणें, कोंडवाड्याची व्यवस्था पाहाणें, गांवचा वसूल करणें, व गुन्हा घडल्यास वरिष्ठ अधिकाऱ्याकडे कळविणें हीं पाटलाचीं कामें आहेत.

तलाठी—**हा सरकारनें नेमलेला** असतो. त्यास २ तें १०।१२ गांवांचें काम पाहावें लागतें. पाटलाचें लिहिण्याचें काम करणें, गांवांतील जमिनीच्या मालकीसंबंधानें, तींतील पिकांसंबंधानें व तिच्या धाऱ्यासंबंधानें कागदपत्र तयार करणें हीं कामें तलाठ्यास करावीं लागतात.

वेसकर—सरकारी कामगारांचा हुकूम पाळणें, वसूल झालेला पैसा तालुक्याच्या ठिकाणीं नेणें व गांवांतील विशेष गोष्टी पाटलास कळविणें हीं त्याचीं कामें आहेत.

म्युनिसिपालिटी—ज्या गांवची लोकसंख्या **पांच हजारांपेक्षां जास्त** असते, अशा गांवची व्यवस्था पाहाण्याकरितां एक कमिटी असते. त्या कमिटीस **म्युनिसिपल कमिटी** म्हणतात; व या सर्व संस्थेस **म्युनिसिपालिटी** म्हणतात. या जिल्ह्यांत **अलिबाग, पेण, रोहें, पनवेल, उरण, माथेरान** व **महाड** या ठिकाणीं अशा **म्युनिसिपल कमिट्या आहेत.**

गांवांत स्वच्छता ठेवणें; शिक्षण, पाणी, औषध यांची सोय करणें; रस्त्यावर रात्रीं दिवे लावणें; रस्ते दुरुस्त ठेवणें, धर्मशाळा बांधणें; वगैरे लोकोपयोगी कामें या कमिटीस करावीं लागतात. या कामास लागणारा पैसा घरपट्टी, पाणीपट्टी, भंगीपट्टी व मालगाड्या यांवर जकात वगैरे करांच्या द्वारें लोकांपासून वसूल करण्यांत येतो.

सॅनिटेशन कमिटी—ज्या गांवीं म्युनिसिपालिटी नसते त्या गांवची व्यवस्था पाहाण्याकरितां **सॅनिटेशन कमिटी** असते, अशा कमिट्या **नेरळ** व **रेवदंडा** एथें आहेत. या कमिटींत **तीन सभासद** असून ते सरकारनें निवडलेले असतात. गांवच्या आरोग्यास अपायकारक अशा गुन्ह्यांची चौकशी करून **गुन्हेगारांस दंड करण्याचा अधिकारही या कमिटीस असतो.**

ग्रामपंचायत—ज्या गांवीं म्युनिसिपालिटी अगर सॅनिटेशन कमिटी नसते त्या गांवची व्यवस्था पाहाण्याकरितां **ग्रामपंचायती** स्थापन करण्यांत येतात. अलीकडे एथील कांहीं गांवांतून लोकहिताचीं कामें पाहाण्याकरितां अशा कमिटया स्थापन केल्या आहेत.

को-ऑपरेटिव्ह सोसायटी (परस्पर साह्यकारी मंडळी)—लोकांना योग्य व्याजाचे दरानें कर्ज मिळावें व इतर कामींही त्यांस मदत व्हावी म्हणून या जिल्ह्यांतील पुष्कळ गांवीं ही सोसायटी स्थापन करण्यांत आली आहे.

अभ्यास—[१] गांवकामगार कोणकोण असतात ? [२] त्यांचीं कामें सांगा. [३] म्युनिसिपालिटीचीं कामें कोणतीं ? [४] सॅनिटेशन कमिटी व ग्रामपंचायत यांचा उपयोग काय ?

पाठ अकरावा

तालुक्यांतील मुख्य अधिकारी

मुलकीखातें— प्रत्येक तालुक्यावर **मामलेदार** व पेटयावर **महालकरी** नांवाचा मुख्य अधिकारी असतो. तालुक्यांतील जमिनीचा सारा वसूल करणें, खजिना संभाळणें व तालुक्यांत होणाऱ्या लहान लहान गुन्ह्यांची कायद्याप्रमाणें व्यवस्था करणें हीं कामें त्यास करावीं लागतात. तालुक्यांतील सर्व व्यवस्था नीट ठेवण्याची जबाबदारी मामलेदारावर व पेटयाची जबाबदारी महालकरी याजवर असते. या अधिकाऱ्यास, जमिनीचा सारा वसूल करणारा अधिकारी या नात्यानें **मामलेदार** (पेटयावरील महालकरी) व गुन्ह्यांची चौकशी करणारा अधिकारी या नात्यानें **मॅजिस्ट्रेट** हे हुद्दे असतात.

न्यायखातें—देवघेव आणि वतनासंबंधाच्या फिर्यादीचा निकाल करण्याकरितां **मुनसफ** (सबॉर्डिनेट जज्ज] या नांवाचा अधिकारी प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणीं असतो. **कर्जत व माणगांव या दोन तालुक्यांत हा अधिकारी नाहीं.** या तालुक्याचें न्यायाचें काम त्यांच्या शेजारच्या तालुक्यांवर सोपविलेलें आहे.

पोलिसखातें—चोरी, मारामारी, खून वगैरे गुन्हे घडूं नयेत म्हणून बंदोबस्ताकरितां तालुक्याच्या ठिकाणीं जो अधिकारी असतो त्यास **पोलिस सब-इन्स्पेक्टर** [फौजदार] म्हणतात.

रेजिस्ट्रेशन [नोंदणी] **खातें**--मिळकतींची व देण्याघेण्या-संबंधींचीं खतें आणि करार नोंदण्यास प्रत्येक तालुक्यावर **सब-रेजिस्ट्रार** नांवाचा अधिकारी असतो.

पोस्टखातें—टपालांतून आलेलीं पत्रें, मनी-ऑर्डरी, पार्सलें वगैरे देण्याघेण्याकरितां **सब-पोस्टमास्तर** नांवाचा अधिकारी असतो.

वैद्यखातें--आजारी मनुष्यास औषधें देण्यास तालुक्याच्या ठिकाणीं **सब असिस्टंट सर्जन** नांवाचा अधिकारी असतो.

इंजीनियरखातें—सरकारी रस्ते व इमारती यांची दुरुस्ती ठेवंण्याकरितां **ओव्हरसीयर** नांवाचा अधिकारी असतो.

शिक्षणखातें—शाळांच्या परीक्षा घेऊन शिक्षणासंबंधीं व्यवस्था पाहाण्याकरितां प्रत्येक दोन तालुक्यांवर **सुपरवायझर** नांवाचा अधिकारी असतो. फी गोळा करणें व तालुक्यांतील सर्व शिक्ष-कांचा पगार वांटणें हीं कामें **हेड (तालुका) मास्तर**कडे असतात.

तालुका लोकलबोर्ड--जिल्हा लोकलबोर्डाची शाखा प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणीं असते. तिला **तालुका लोकलबोर्ड** म्हणतात. या बोर्डाचीं कामें व उत्पन्नाच्या बाबी याजबद्दलची माहिती पुढील पाठांत मिळवूं.

अभ्यास—[१] तालुक्याचा मुख्य अधिकारी कोण ? त्याचीं कामें कोणतीं ? [२] तालुक्यांतील इतर मुख्य अधिकाऱ्यांचीं नांवें सांगा. [३] त्यांचीं कामें कोणतीं ?

पाठ बारावा

जिल्ह्यांतील मुख्य अधिकारी

मुलकीखातें—जिल्ह्यांतील सर्व अधिकाऱ्यांवरील मुख्य अधिकारी **कलेक्टर** होय. कलेक्टर म्हणजे गोळा करणारा. लोकांवरील कर-मुख्यतः जमिनीचा वसूल तो गोळा करतो म्हणून त्यास कलेक्टर असें म्हणतात. जमिनीचा सारा व अन्य कर वसूल करणें, गुन्ह्यांचा बंदोबस्त करून शांतता राखणें, इतर सर्व अधिकाऱ्यांवर देखरेख करणें, व आपल्या ताब्यांतील मुलूख चांगल्या स्थितींत ठेवणें हीं कलेक्टरचीं कामें आहेत. त्यास सर्व जिल्ह्यासंबंधानें **पहिला वर्ग [फर्स्ट क्लास] मॅजिस्ट्रेटचा** अधिकार असतो. या नात्यानें त्यास **जिल्हा [डिस्ट्रिक्ट] मॅजिस्ट्रेट**, दस्त-नोंदणीच्या कामावरील मुख्य अधिकारी या नात्यानें त्यास **जिल्हा [डिस्ट्रिक्ट] रजिस्ट्रार** व संस्थानांवर देखरेख ठेवणारा या नात्यानें **पोलिटिकल एजंट** हे हुद्दे आहेत.

या जिल्ह्याचे कलेक्टरचे मदतीस **प्रांत** नांवाचे दोन अधिकारी आहेत. त्यांच्याकडे **भागांचें काम** असतें.

न्यायखातें—जिल्ह्यांतील सर्व मुनसफ [सब-जज्ज] यांवरील अधिकारी **जिल्हा [डिस्ट्रिक्ट]** जज्ज होय. हा अधिकारी ठाणें एथें असतो.

पोलीसखातें— जिल्ह्यांतील सर्व पोलीस सब-इन्स्पेक्टर (फौजदार) यांवरील अधिकारी **पोलीस सुपरिंटेंडेंट** होय.

वैद्यखातें—जिल्ह्यांतील सर्व सब-असिस्टंट सर्जनांवरील मुख्य अधिकारी **सिव्हिल सर्जन** होय.

शिक्षणखातें— जिल्ह्यांतील सर्व शाळांवर **ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर** नांवाचा अधिकारी असतो. त्याचप्रमाणें शाळांची तपासणी व सर्वसाधारण देखरेख करण्याकरितां **सरकारतर्फे एक सीनिअर आसिस्टंट डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर** या नांवाचा अधिकारी असतो. हें **खातें हल्लीं डिस्ट्रिक्ट लोकलबोर्डाच्या ताब्यांत दिलेलें आहे. त्या बोर्डातून एक स्कूल कमिटी नेमण्यांत येते. त्या कमिटीनें या खात्याची व्यवस्था** पाहावयाची असते.

इंजीनियरखातें—या खात्यावर **एक्झिक्यूटिव्ह इंजीनियर** नांवाचा अधिकारी असतो. याकरितां एथें **स्वतंत्र अधिकारी** नाहीं. हें काम ठाणें व रत्नागिरी या ज़िल्ह्यांकडे दिलेलें आहे.

न्याय व इंजीनियर खातें यांखेरीज बाकीचे सर्व अधिकारी अलिबाग एथेंच असतात.

लोकलबोर्ड—जिल्ह्यांतील व तालुक्यांतील कांहीं सार्वजनिक कामांची व्यवस्था पाहाण्याकरितां **लोकलबोर्ड** नांवाची एक संस्था असते. दवाखाने, धर्मशाळा, विहिरी, तळीं वगैरे बांधणें, **प्राथमिक शिक्षणाची सोय करणें**, रस्त्यांची दुरुस्ती करून त्यांच्या बाजूला झाडें लावणें, देवी काढणें वगैरे कामें या कमिटीस करावीं लागतात.

शेतकऱ्यांपासून लोकलफंड म्हणून वसूल केलेला पैसा; नावा, जकात यांपासून होणारें उत्पन्न; वाळू, दगड वगैरेवर घेतलेला कर व सरकारकडून मिळणारी मदत वगैरे उत्पन्नांतून वरील सर्व कामें करावयाचीं असतात.

जिल्हा स्कूलबोर्ड—जिल्ह्यांतील शाळांची व्यवस्था पाहाण्या-करितां **जिल्हा लोकलबोर्डांतून** एक स्वतंत्र कमिटी निवडण्यांत येते, तिला **जिल्हा स्कूलबोर्ड** म्हणतात. त्यांत सरकारनें निवडलेले चार व लोकांनीं निवडलेले बारा मिळून सोळा सभासद असतात. या बोर्डाच्या मुख्य अधिकाऱ्यास **चेअरमन** म्हणतात. त्याचें ऑफिस अलिबाग एथेंच आहे. **आपल्या जिल्ह्यांतील शाळा सन १९२७ पासून सरकारनें लोकलबोर्डाच्या ताब्यांत दिलेल्या आहेत.**

इतिहास––पेशवाईच्या अखेरीस इ० सन १८१८ मध्यें हा प्रदेश इंग्रजांकडे आला.

अभ्यास––(१) जिल्ह्यांतील मुख्य अधिकारी कोण ? (२) त्याचीं कामें कोणतीं ? (३) जिल्हा लोकलबोर्डाची माहिती सांगा. (४) पोलीस, शाळा, वैद्य वगैरे खात्यांवरील अधिकारी कोण ? (५) त्यांचीं कामें सांगा.

भाग दुसरा

विशेष वर्णन

दक्षिण प्रांत

पाठ तेरावा

तालुका अलिबाग

आतांपर्यंत आपण आपल्या जिल्ह्याची सामान्य माहिती मिळविली. आतां प्रत्येक तालुक्यांतील गांवें, नद्या वगैरे विशेष माहिती मिळवूं. आपल्या जिल्ह्याचें मुख्य शहर जें अलिबाग तेथून प्रथम सुरवात करूं.

नद्या— पाण्याच्या मोठ्या प्रवाहास नदी म्हणतात. या तालुक्यांत बोरघर व रामराज ह्या मुख्य न आहेत. नदी जेथून निघते त्या ठिकाणास उगम जेथें ती. समुद्रास मिळते त्या ठिकाणास तिचें मुख म्हणतात. बोरघर ही बेलोसीच्या जंगलांत व रामराज ही महानच्या जंगलांत उगम पावून त्या रोह्याच्या खाडीस मिळतात.

डोंगर—जमिनीच्या उंचवट्यास टेकडी म्हणतात. टेकडी मोठी असली म्हणजे तिला डोंगर म्हणतात. असे डोंगर या तालुक्याच्या मध्यभागीं बरेच आहेत. त्यांत कनकेश्वर व सागरगड हे दोन मोठे आहेत.

गांवें—अलिबाग—हें या जिल्ह्याचें मुख्य शहर आहे. ज्या गांवांत लोकवस्ती बरीच असते त्या गांवास शहर म्हणतात. एथें कलेक्टर, प्रांत (अ० कलेक्टर) वगैरे जिल्ह्याचे अधिकारी

यांच्या कचेऱ्या आहेत. इंग्रजी, मराठी व धंदेशिक्षणाची सोय एथें चांगली आहे. लोक विद्वान् आहेत. एथील देवळें, वेधशाळा, मार्केट हीं पाहाण्यासारखीं आहेत. हें शहर पूर्वीं आंग्र्यांची राजधानी होतें. **किहीम**–उत्तम हवेचें ठिकाण–गांव बागायती आहे. श्रीमान् लोक एथें हवेकरितां येतात. **आवास**–एथील नागोबाचें देवस्थान प्रसिद्ध आहे. सर्प चावलेल्या मनुष्यास या देवळांत आणिलें असतां त्याचें विष उतरतें असें म्हणतात. कार्तिक शुद्ध १२ ते १४ पर्यंत एथें मोठी यात्रा भरते. **सासवनें**–'वैश्य विद्याश्रम' नांवाची शिक्षण-संस्था पाहाण्यासारखी आहे. एथील केळीं चांगलीं असतात. **मांडवें**–कोळी लोक दर्यावर्दीपणांत कुशल आहेत. एथून दररोज मासे, लाकूड व भाजीपाला वगैरे माल मुंबईस रवाना होतो.

अभ्यास—[१] एथील हवामान सांगा. [२] कारण ? [३] अलिबाग, सासवनें हीं गांवें कशाकरितां प्रसिद्ध आहेत ? [४] अलिबाग ते पेणपर्यंत कोणत्या मार्गानें जातां येईल ?


पाठ चौदावा

तालुका अलिबाग (पुढें चालू)

मागल्या पाठांत आपण अलिबाग तालुक्यांतील उत्तरेकडील गांवांची व त्या तालुक्यांतील नद्या, डोंगर वगैरेंची माहिती मिळविली. आतां दक्षिणेकडील गांवें व त्या तालुक्यांतील किल्ले, क्षेत्रें वगैरेंची माहिती मिळवूं.

गांवें—नागांव–गांव बागायती आहे. एथील देवळें पाहाण्यासारखीं आहेत. दर गुरुवारीं एथें मोठा बाजार भरतो. **चौल**–गांव बागायती आहे. एथील रामेश्वर, शितळादेवी, भगवती, हिंगुळजादेवी,

दत्त वगैरे देवस्थानें पाहाण्यासारखीं आहेत. एथें लेणीं आहेत. डोंगरांतील दगडांत कोरलेल्या चित्रांना लेणीं म्हणतात. **रेवदंडा**–उत्तमपैकीं व्यापारी बंदर. **समुद्राच्या कडेला गलबतें वगैरे लावण्यास सोईचें असें जें ठिकाण असतें त्यास बंदर** म्हणतात. पूर्वीं एथें अनेक कारखाने व उत्तम कारागीर होते. एथील भुईकोट हल्लीं पडक्या स्थितींत आहे. **भोवतीं तट बांधून तयार केलेल्या जागेस किल्ला म्हणतात. किल्ला जमिनीवर असला म्हणजे त्याला भुईकोट म्हणतात.** हल्लीं एथें चांदीचीं भांडीं तयार होतात. पूर्वीं उत्तम रेशमी कापड होत असे.



कुलाबा किल्ला

क्षेत्रें—कनकेश्वर–कनकेश्वराचें प्रसिद्ध देवस्थान. कार्तिकी पौर्णिमेस व महाशिवरात्रीस एथें मोठी यात्रा भरते. हें तीर्थाचें ठिकाण आहे. त्यामुळें याला क्षेत्र असें म्हणतात. एथून मुंबईचा आणि भोवतालचा देखावा फार मनोहर दिसतो.

किल्ले—कुलाबा, खांदेरी व उंदेरी हे जंजिरे किल्ले आहेत.

पाण्यांतील किल्ल्यास जंजिरा म्हणतात. मागील कुलाबा किल्ल्याचें चित्र पाहा. भरतीच्या वेळीं याच्या चारही बाजूला पाणी असतें व ओहोटीच्या वेळीं याच्या भोवतालची सर्व जमीन उघडी पडते. आपल्या जिल्ह्याला कुलाबा जिल्हा हें नांव याच किल्ल्यावरून पडलें आहे. हें पूर्वीं आंग्र्यांचें आरमाराचें ठिकाण होतें. **लढाऊ जहाजांस आरमार म्हणतात.** एथील श्रीगणपतीचें देवस्थान पाहाण्यासारखें आहे. कोर्लई व सागरगड—हे डोंगरी किल्ले आहेत. **डोंगरावरील किल्ल्यास डोंगरी किल्ला (गड)** म्हणतात. कोर्लई किल्ल्याच्या पायथ्याशीं कोर्लई नांवाचा गांव आहे. तेथें वांगीं वगैरे भाजीपाला यांचें उत्पन्न बरेंच होतें.

पोस्ट ऑफिसें—***अलिबाग**, थळ, किहीम, आवास, सारळ, नांरगी, पोयनाड, **धरमतर**, नागांव, चौल, **रेवदंडा** व कोर्लई.

अभ्यास—[१] प्रसिद्ध देवस्थानें कोणतीं ? [२] रेवदंड्याचें हवामान सांगा. [३] प्रसिद्ध किल्ले कोणते ? [४] एथील क्षेत्रें सांगा.

टीप—आपल्या तालुक्याची माहिती देतांना तेथील पिकें, हवा, पाऊस, व्यापार, रस्ते, मर्यादा यांची सविस्तर माहिती द्यावी. व्याख्या एकदम पाठ करून घेऊं नये जरूर तेथें त्यांचा उपयोग करावा. (अलिबाग तालुका पाहा.)

पाठ पंधरावा

तालुका रोहें

अलिबाग तालुक्यांतून आतां आपण असेच दक्षिणेकडे जाऊं. जवळच हा रोहें तालुका पाहा. या तालुक्याची माहिती मिळवूं. सन १९२३ पासून पेण तालुक्यांतील नागोठणें पेटा मोडून नागोठणें

*जीं पोस्ट ऑफिसें जाड टाइपांत दाखविलीं आहेत तेथें तार ऑफिसेंही आहेत.

व त्याच्या आसपासचे कांहीं गांव यांचा समावेश या तालुक्यांत केला आहे.

नद्या—**कुंडलिका** ही या तालुक्यांतील मोठी नदी आहे. ही सह्याद्रीमध्यें उगम पावते व रोह्याच्या खाडीस मिळते. या नदीस बाराही महिने पाणी असतें. **गंगा** ही कारिवण्याजवळ उगम पावते. हिचा व कुंडलिकेचा रोठें गांवाजवळ संगम झाला आहे. दोन नद्या जेथें एकत्र मिळतात त्या ठिकाणास संगम म्हणतात.

डोंगर—**अवचितगड** व **कळसागिरी** हे मोठे आहेत. शिवाय लहान लहान डोंगर बरेच आहेत.

गांवें—**रोहें**—या तालुक्याचें मुख्य शहर. तालुक्यांतील मुख्य कचेऱ्या एथेंच आहेत. इंग्रजी व मराठी शिक्षणाची सोय एथें चांगली आहे. घाटावरील माल एथें बराच येतो, त्यामुळें एथें व्यापार फार चालतो. टाटा कंपनीचें पाणी सुटत असल्यामुळें एथील लोकांस हल्लीं पाण्याचा भरपूर पुरवठा होतो. **अष्टमी**—रहदारी गांव. एथें मच्छीचा मोठा व्यापार चालतो. इस्रायल लोकांचीं वस्ती एथें बरीच आहे. **पिंगळसई**—एथील देवीचें व गणपतीचें हीं देवस्थानें प्रसिद्ध आहेत. **धाटाव**—भाजीपाल्याचें व उसाचें उत्पन्न एथें बरेंच होतें. **चणेरें**—दर मंगळवारीं एथें मोठा बाजार भरतो. **नागोठणें**—मोठ्या रहदारीचा गांव. पूर्वीं पेट्याचें मुख्य शहर होतें. तें मुंबई-महाबळेश्वर रस्त्यावर असल्यामुळें यास विशेष महत्त्व आलें आहे.

किल्ले—घोसाळें व **अवचितगड**—हे डोंगरी किल्ले पाहाण्यासारखे आहेत.

उन्हाळीं—उन्हेरें एथें आहेत. **ऊन पाण्याच्या झऱ्यांस उन्हाळीं म्हणतात.**

पोस्ट ऑफिसें—रोहें, अष्टमी, **नागोठणें,** कोलाड, चणेरें, बिरवाडी व मेढें.

अभ्यास—[१] व्यापारी गांवें सांगा. [२] एथील हवा कशी असेल ? [३] कारण ? [४] प्रसिद्ध किल्ले कोणते ? [५] पाहाण्या-सारखीं ठिकाणें सांगा.

पाठ सोळावा

तालुका माणगांव

आतां आपण असेच दक्षिणेकडे माणगांव तालुक्यांत जाऊं व तेथील माहिती मिळवूं.

नद्या—**काळ** व **गोडी** या दोन मोठ्या नद्या आहेत. काळ ही सह्याद्रींत उगम पावून गोरेगांवच्या खाडीस मिळते. हिला उत्तरे-कडून माणगांवजवळ गोडी नदी मिळते.

डोंगर—उत्तरेस **द्रोणागिरि** हा मोठा डोंगर आहे. शिवाय पूर्व व पश्चिम बाजूला लहान लहान डोंगर बरेच आहेत.

गांव—**माणगांव** हें या तालुक्याचें मुख्य ठिकाण. एथें या तालुक्यांतील मुख्य (कोर्ट खेरीज) कचेऱ्या आहेत. नोकरांकरितां एथें सरकारी चाळी बांधिल्या आहेत. **खरवली**--एथें लुगडीं तयार होतात. **गोरेगांव**-भाताचा मोठा व्यापार चालतो. लुगडीं तयार होतात. चैत्र पौर्णिमेस एथें बहिरीची मोठी यात्रा भरते. **मोर्बे**—भाताचा व्यापार चालतो. मुसलमान लोकांची वस्ती बरीच आहे. एथें तयार होणाऱ्या घोंगड्या चांगल्या असतात.

भिरा—टाटा कंपनीचा विजेचा कारखाना पाहाण्यासारखा आहे.

किल्ले— **तळें**—हा डोंगरी किल्ला पाहाण्यासारखा आहे.

पायथ्याशीं तळें नांवाचा गांव आहे. तेथें शेतीचें उत्पन्न फार होतें, लोक सुखवस्तु आहेत. एथें एक **वेदपाठशाळा** आहे.

लेणीं— **मांदाड**–उत्तमपैकीं बंदर. जवळच **कुडें** एथील लेणीं पाहाण्यासारखीं आहेत.

पोस्ट ऑफिसें—**माणगांव, गोरेगांव,** तळें, निजामपूर, मोर्बे, भिरा व बोरवाडी.

अभ्यास— [१] माणगांवची हवा कशी असेल? [२] कारण? [३] गोरेगांव, तळें, मांदाड हीं कशाविषयीं प्रसिद्ध आहेत? [४] एथें पाऊस जास्त पडत असेल कीं कमी? [५] कारण?

पाठ सतरावा

तालुका महाड

असेच दक्षिणेकडे चला. पुढें हा महाड तालुका पाहा. आतां एथील माहिती मिळवूं.

नद्या— मुख्य नदी **सावित्री** ही सह्यपर्वतांत उगम पावते, व या तालुक्यांतून वाहात जाऊन अरबी समुद्रास मिळते. हिच्यामुळेंच पुढें बाणकोटची खाडी झाली आहे. हिला पूर्वेकडून भोराजवळ काळ व उत्तरेकडून महाडाजवळ **गांधारी** नदी मिळते.

डोंगर—**रायगड, नातोंडी, तुर्भ** व **प्रतापगड** हे मोठे मोठे डोंगर आहेत. शिवाय सर्व बाजूंस लहान लहान डोंगर आहेत. **या जिल्ह्यांत रायगडची उंची सर्वांत जास्त आहे.**


गांवें—**महाड**–हें या तालुक्याचें मुख्य शहर. या तालुक्यांतील मुख्य कचेऱ्या एथेंच आहेत. नारळ, तांदूळ वगैरे बराच माल एथून घाटावर रवाना होतो. इंग्रजी, मराठी शिक्षणाची सोय एथें चांगली आहे. व्यापारी पेठ. हें सावित्री व गांधारी या दोन नद्यांच्या संगमा-

जवळ आहे. त्यामुळें पूर येऊन शहराचें नुकसान होण्याचा बराच संभव असतो. सन १९२३ च्या पुरानें तीनचार लक्षांचें नुकसान झालें असें म्हणतात. **दासगांव**– एथें लुगडीं तयार होतात. दर शनिवारीं एथें मोठा बाजार भरतो.



किल्ले—रायगड–प्रसिद्ध डोंगरी किल्ला. **श्रीशिवाजीमहाराज यांचें राजधानीचें ठिकाण.** एथें त्यांची हल्लीं समाधि आहे. हें बाजूला शिवाजीचें चित्र पाहा. त्यांच्याबद्दलची माहिती तुम्हांला चौथ्या इयत्तेंत कळेल. **एथें शिवजयंत्युत्सव होतो.**

प्रतापगड---प्रसिद्ध डोंगरी किल्ला. एथें श्रीभवानी देवीचें प्रसिद्ध देवस्थान आहे. नवरात्रांत एथें मोठा उत्सव होतो.



प्रतापगड.

लेणीं—**पालें**-एथील लेणीं पाहाण्यासारखीं आहेत. इतकीं उत्तम लेणीं कोंकणपट्टींत दुसरीं नाहींत.

उन्हाळीं—सव व कोंडिवतें एथें आहेत.

पोस्ट ऑफिसें—महाड, दासगांव, नातें, बिरवाडी, बहूर, विन्हेरें, माटवण व पोलादपूर.

अभ्यास—[१] एथून देशावर कोणता माल जात असेल? [२] कारण? [३] एथील हवामान सांगा. [४] प्रसिद्ध किल्ले कोणते? [५] महाड ते रेवदंड्यापर्यंतचा प्रवास कोणकोणत्या मार्गानें करतां येईल?

पाठ अठरावा

उत्तरप्रांत.

तालुका पनवेल

आतांपर्यंत आपण अलिबाग, रोहें, माणगांव व महाड या चार तालुक्यांची माहिती मिळविली. एथून या जिल्ह्याचा दक्षिणप्रांत संपला. याच्यापुढें रत्नागिरी जिल्हा आहे. म्हणून आपण एथून परत अलिबाग तालुक्यांत जाऊं. उत्तरेकडे हा पनवेल तालुका पाहा. या तालुक्याची माहिती आतां मिळवूं. एथून या जिल्ह्याच्या उत्तर-प्रांताला आरंभ होतो. हा तालुका मोठा आहे, म्हणून पनवेल तालुका व उरण पेटा असे याचे दोन भाग केले आहेत. **तालुक्याच्या पोटभागास पेटा म्हणतात.**

नद्या—**पाताळगंगा** व **गाढी** या दोन मोठ्या नद्या आहेत. पाताळगंगा—ही कर्जत तालुक्यांतून येऊन या तालुक्यांतून वाहात जाते व आपट्याच्या खाडीस मिळते. आपटे गांवापर्यंत हिचा जलमार्गाप्रमाणें उपयोग होतो. **हिला बाराही महिने पाणी असतें.** **गाढी**—ही या तालुक्यांत पूर्वेकडील डोंगरांत उगम पावून पनवेलचे खाडीस मिळते.

डोंगर—**माणिकगड** व **कर्नाळा** हे मोठे डोंगर आहेत. शिवाय पूर्व व दक्षिण बाजूला लहान लहान डोंगर पुष्कळ आहेत.

गांवें— **पनवेल**—हें या तालुक्याचें मुख्य शहर. एथें तालुक्यांतील मुख्य अधिकाऱ्यांच्या कचेऱ्या आहेत. इंग्रजी व मराठी शिक्षणाची सोय एथें चांगली आहे. एथें भाताचा व्यापार चालतो. देशी औषधांचा एथें एक मोठा कारखाना आहे. ही व्यापाराची पेठ आहे. भात दळण्याच्या गिरण्या एथें बऱ्याच आहेत. एथें टाटा कंपनीचा विजेचा साठा आहे. **पळस्पें**—गांव मोठा आहे. भात दळण्याच्या गिरण्या एथें बऱ्याच आहेत. **आपटें**—भाताचा व मिठाचा मोठा व्यापार चालतो. बाजाराचें ठिकाण. एथें खाऱ्या जमिनी बऱ्याच आहेत.

किल्ले—**माणिकगड**—याच नांवाच्या डोंगरावर आहे.


उरण पेटा

गांवें—**उरण**—हें या पेट्याचें मुख्य ठिकाण. या पेट्यांतील मुख्य कचेऱ्या एथेंच आहेत. एथील होरमोसजी पारशी यांची बाग पाहाण्यासारखी आहे. मिठाचें उत्पन्न एथें बरेंच होतें.

करंजें—मच्छीचा व्यापार चालतो. ख्रिस्ती लोकांची वस्ती असून शिक्षणाची सोय एथें बरी आहे. **मोरें**-कोळी लोकांची वस्ती बरीच आहे. त्यांचा मच्छीचा व्यापार दररोज मुंबई शहराशीं चालतो. **मुळें**-

खंड व शेवें--एथें मिठाचें उत्पन्न बरेंच होतें. [सातव्या पाठांतील मिठागराचें चित्र पाहा.]

लेणीं—घारापुरी—हें उरणजवळ लहानसें बेट आहे. चारही बाजूंला पाणी असलेल्या जमिनीस बेट म्हणतात. एथील लेणीं पाहाण्यासारखीं आहेत.



घारापुरी लेणीं.

पोस्ट ऑफिसें—पनवेल, पळस्पें, आपटें, चिरनेर, मोहोपाडा, उरण व साई.

अभ्यास—[१] भाताचा व्यापार कोठें चालतो? [२] कारण? [३] या तालुक्याचे भाग सांगा. [४] ते कां पाडतात? [५] प्रसिद्ध लेणीं कोणतीं?

पाठ एकोणीसावा

:o:

तालुका कर्जत

या पेट्यांत डोंगर व नद्या म्हणण्यासारख्य नाहींत.

चला. आतां आपण असेंच पूर्वेकडे कर्जत तालुक्यांत जाऊं व तेथील माहिती मिळवूं. पनवेल तालुक्याप्रमाणें हाही तालुका मोठा आहे. त्यामुळें कर्जत तालुका व खालापूर पेटा असे याचे दोन भाग केले आहेत.

नद्या– मुख्य नदी **उल्हास**–ही बोरघाटांत उगम पावून कल्याणचे खाडीस मिळते. या नदीस **बाराही महिने पाणी** असतें. हिला पूर्वेकडून पेज नदी कोल्हारें गांवाजवळ व खांडसची नदी मानिवली गांवाजवळ मिळते.

डोंगर— पूर्वेकडे **सह्याद्रि हा मोठा पर्वत आहे** शिवाय सर्व तालुकाभर लहान लहान डोंगर बरेच आहेत. **लांब व उंच डोंगरास पर्वत म्हणतात.**

गांवें— **कर्जत**-हें या तालुक्याचें मुख्य शहर आहे. एथें या तालुक्यांतील मुख्य कचेऱ्या आहेत. एथील आंब्याची बाग व शेतकी शिक्षणाची शाळा हीं पाहण्यासारखीं आहेत. **कडाव**--श्रीगणपतीचें प्रसिद्ध देवस्थान. एथें माघ शुद्ध ४ स मोठा उत्सव होतो. **वैजनाथ**– एथें लुगडीं व कापड विणण्याचे कारखाने आहेत. एथील साधु वामनबुवा यांची पुण्यतिथि एथें मोठ्या थाटानें होते. **भिवपुरी**– उसाचें उत्पन्न फार. एथें टाटा कंपनीचा विजेचा कारखाना आहे. **दहिवली**--विठोबाचें प्रसिद्ध देवस्थान. एथें कार्तिक वद्य ११ स मोठी यात्रा भरते. **नेरळ**–व्यापाराची मोठी पेठ. कातकरी मुलांना शिक्षण देण्याची सोय एथें चांगली आहे.

क्षेत्रें--**भीमाशंकर**--शंकराचें प्रसिद्ध स्थान. महाशिवरात्रीस एथें मोठी यात्रा भरते. एथून भीमा नदीचा उगम झाला आहे.

लेणीं--**कोंडाणें** व **आंबिवली** एथें आहेत. **कोंडाणें एथील लेण्यांतील बुद्धाची मूर्ति पाहाण्यासारखी आहे.**

किल्ले--**कोटलीगड, भीमगड** व **राजमाची** हे डोंगरी किल्ले आहेत.

खालापूर पेटा

नद्या—मुख्य नदी **पातालगंगा** ही आडोशी गांवाजवळ उगम पावून या पेट्यांतून पनवेल तालुक्यांत वाहात गेली आहे.

डोंगर—कर्जत तालुका व खालापूर पेटा यांच्यामध्यें लहान लहान डोंगर पुष्कळ आहेत. त्यांत **माथेरानचा** डोंगर मोठा आहे.

गांवें—**खालापूर** हें या पेट्याचें मुख्य ठिकाण आहे. एथें या पेट्यांतील मुख्य कचेऱ्या आहेत. दर मंगळवारीं एथें मोठा बाजार भरतो. **खोपोली**—नाना फडणवीस तलाव व शंकराचें देवालय हीं पाहाण्यासारखीं आहेत. एथें वीज तयार करण्याचा कारखाना आहे. या विजेवर मुंबईतील बऱ्याच गिरण्या चालतात. देशावरील माल नेआण करण्याचें बोरघाटांतील हें महत्त्वाचें ठिकाण आहे. **चौक**—मुंबई-पुणें रस्त्यावरील हें महत्त्वाचें व्यापाराचें ठिकाण आहे. **माथेरान** एथील हवा थंड व आरोग्यकारक आहे. त्यामुळें श्रीमान् लोक थंड हवेकरितां एथें येतात. कांहीं एथें बंगले बांधून राहिले आहेत.

लेणीं—**जांबरुंग** व **हाळखुर्द**–एथें लहानशीं परंतु प्रसिद्ध लेणीं आहेत.

पोस्ट ऑफिसें—**नेरळ, माथेरान, कर्जत**, जांबिवली, **चिंचवली**, कोहीळ, चौक, खालापूर व **खोपोली**.

अभ्यास—[१] एथील हवामान सांगा. [२] प्रसिद्ध क्षेत्रें व लेणीं कोणतीं ? [३] कर्जत, खालापूर, वैजनाथ व चौक यांची प्रसिद्धि सांगा. [४] एथें पाऊस जास्त पडेल कीं कमी ? [५] कारण ?

पाठ विसावा

तालुका पेण

आतां जवळच दक्षिणेकडे पेण तालुक्यांत जाऊं, व तेथील माहिती मिळवूं. एथून या जिल्ह्याचा उत्तरप्रांत संपला. पूर्वी पेण तालुका व नागोठणें पेटा असे या तालुक्याचे दोन भाग होते. परंतु सन १९२३ पासून नागोठणें पेटा मोडून कासू व त्याच्या जवळचे कांहीं गांव यांचा समावेश पेण तालुक्यांत व बाकीच्या गांवांचा समावेश रोहें तालुक्यांत केला आहे.

नद्या—अंबा व भोगावती या दोन मोठ्या नद्या आहेत. अंबा ही सुधागड तालुक्यांतून या तालुक्यांत वाहात येते, व नागोठण्याच्या खाडीस मिळते. भोगावती ही मिऱ्या डोंगरांत भोगेश्वर एथें उगम पावून अंतोऱ्याच्या खाडीस मिळते.

डोंगर—मिऱ्या व साक्सई हे मोठे डोंगर आहेत. शिवाय उत्तर, पूर्व व ईशान्य या दिशांना लहान लहान डोंगर बरेच आहेत.

गांवें—पेण—हें या तालुक्याचें मुख्य शहर आहे. या तालुक्यांतील मुख्य कचेऱ्या एथेंच आहेत. मराठी व इंग्रजी शिक्षणाची सोय एथें चांगली आहे. हें शहर या जिल्ह्याच्या मध्यभागीं आहे. त्यामुळें एथें व्यापार फार चालतो. एथें लाकडी रंगित सामान तयार होतें. दर शनिवारीं एथें **कुलाबा समाचार** नांवाचें वर्तमानपत्र निघत असतें. त्यावरून आपल्याला जिल्ह्यांतील बऱ्याच बातम्या कळतात. ठिकठिकाणची बातमी देणाऱ्या पत्रास वर्तमानपत्र म्हणतात. जवळच केशव मोतीराम (क्राफर्ड) तलाव पाहाण्यासारखा आहे. या तलावांतील पाणी नळानें पेण शहरांत आणिलें आहे. **मिऱ्या डोंगर**—

एथें शंकराचें देवालय आहे. तेथें महाशिवरात्रीस मोठी यात्रा भरते. एथून सभोंवतालचा देखावा फार मनोहर दिसतो. **कुहिरें**–कातकरी मुलांना शिक्षण देण्याची सोय एथें बरी आहे. **पाटणोली**–शंकराचें देवस्थान पाहाण्यासारखें आहे. एथें महाशिवरात्रीस यात्रा भरते.

मिठागरें—वाशी, कणें व बोर्झेपाडा या ठिकाणीं मीठ पिकवितात. **ज्या ठिकाणीं मीठ पिकवितात त्या ठिकाणास मिठागर म्हणतात.**

किल्ले— साक्सई व **सोनगिरी**–हे डोंगरी किल्ले आहेत. साक्सई किल्ल्याच्या पायथ्याशीं **बद्रुदीन** नांवाच्या साधूचें थडगें आहे. तेथें पौषांत मोठा उरूस भरतो. या कामीं जंजिरा संस्थान सरकारचा बराच पैसा खर्च होतो.

पोस्ट ऑफिसें—पेण, वरसई, वावोशी, कासू व वाशी.

अभ्यास—[१] या तालुक्याचें हवामान सांगा. [२] कारण ? [३] मिठागरें कोठें आहेत ? [४] एथील पिकें सांगा. [५] कारण ? [६] पेण व कुहिरें यांची प्रसिद्ध सांगा. [७] पाहाण्यासारखीं स्थळें सांगा.

भाग ३ रां

संस्थानें

पाठ एकविसावा

भोरसंस्थान--सामान्य वर्णन

आतांपर्यंत आपण कुलाबा जिल्ह्याची बरीच माहिती मिळविली. आतां या जिल्ह्यांतील फक्त संस्थानांची माहिती मिळवावयाची राहिली आहे. आतां पेण तालुक्यांतून असेंच पूर्वेला जाऊं. पुढें हें भोर संस्थान पाहा. लहान व स्वतंत्र राज्यास संस्थान म्हणतात. आतां एथील माहिती मिळवूं. हें संस्थान आपल्या जिल्ह्याच्या पूर्वेस आहे. एथील राजा ब्राह्मण जातीचा आहे. त्यास पंतसचिव म्हणतात. त्यावरून या संस्थानास पंतसचिवाचें संस्थान असेंही म्हणतात. या संस्थानचा एकंदर प्रदेश सुमारें एक हजार चौ० मैलांचा आहे. त्याचें उत्पन्न सुमारें पांच लक्ष रुपये व लोकसंख्या अंदाजें सव्वालाख आहे. एथील मुख्य पीक भाताचें आहे. शिवाय नागली, वरी, लाकूड व हिरडे यांचेंही उत्पन्न बरेंच होतें.

विभाग—**पवनमाळ, प्रचंडगड, राजगड, विचित्रगड व सुधागड** असे या संस्थानचे पांच विभाग पाडले आहेत. त्यांना तालुके म्हणतात. पैकीं **सुधागड तालुक्याचा प्रदेश आपल्या जिल्ह्यांत आहे**. बाकीचा प्रदेश सह्याद्रीच्या पूर्वेस आहे. त्यामुळें तो पुणें व सातारा या जिल्ह्यांत मोडतो.

तालुका सुधागड (विशेष वर्णन)

मर्यादा—नकाशांत हा सुधागड तालुका पाहा. याच्या उत्तरेस-

पेण तालुका, पूर्वेस--सह्यपर्वत, दक्षिणेस--रोहें व माणगांव तालुके आणि पश्चिमेस--रोहें व पेण हे तालुके आहेत.

नद्या—मुख्य नदी **आंबा**. ही सह्यपर्वतांत उगम पावून या तालुक्यांतून पेण तालुक्यांत वाहात गेली आहे. शिवाय वळकी व दातपाडी या लहान नद्या आहेत.

डोंगर—सरसगड हा सर्वांत मोठा डोंगर आहे. शिवाय सर्व तालुकाभर लहान लहान डोंगर बरेच आहेत.

गांवें—पाली--हें या तालुक्याचें मुख्य ठिकाण आहे. या तालुक्यांतील मुख्य कचेऱ्या एथेंच आहेत. व्यापाराची मोठी पेठ. बल्लाळेश्वराचें प्रसिद्ध देवस्थान एथेंच आहे. एथें तांब्या-पितळेच्या भांड्यांचे कारखाने आहेत. एथील शिवजयंत्युत्सव मोठ्या थाटानें होतो. **सिद्धेश्वर**--एथें शंकराचें स्वयंभू (मूळचें) स्थान आहे. **आसरें** एथें स्वदेशी बांगड्या व पोहे चांगले होतात. **उद्धर**–श्रीरामानें स्थापन केलेलें शंकराचें प्रसिद्ध स्थान आहे. एथें महाशिवरात्रीस मोठी यात्रा भरते.

किल्ले—सरसगड-याच नांवाच्या डोंगरावर हा एक किल्ला आहे.

पोस्ट ऑफिसें—पाली, सिद्धेश्वर, जांभूळपाडा व नाडसूर.

अभ्यास—[१] या संस्थानचें उत्पन्न व लोकसंख्या सांगा. [२] भाग कोणते ? [३] ते कां पाडतात ? [४] एथील पिकें सांगा. [५] कारण ? [६] एथील हवामान सांगा. [७] कारण ?

पाठ बाविसावा

जंजिरा संस्थान (सामान्य वर्णन)

मागल्या पाठाच्या वेळीं आपण सुधागड तालुक्याची माहिती मिळविली. एथून या जिल्ह्याची पूर्वहद्द संपली. आतां आपण मागें फिरूं व रोहें तालुक्यांतून असेच पश्चिमेकडे जाऊं. पुढें हें जंजिरा संस्थान पाहा. एथील माहिती आतां मिळवूं. हें संस्थान आपल्या जिल्ह्याच्या पश्चिमेस आहे. एथील राजा मुसलमान जातीचा आहे. त्यास **नबाब** म्हणतात. **हल्लींचे नबाबसाहेब हिज हायनेस सिद्दी महमदखान** हे आहेत. ते राजकोट एथें **राजकुमार कॉलेजमध्यें** शिक्षण घेत असल्यामुळें **हल्लीं त्यांच्या मातुःश्री नामदार कुलसुम बेगमसाहेबा ह्या राज्यकारभार पाहात आहेत.**

हें **मुरूड** पाहा. हें या संस्थानचें मुख्य शहर आहे. एथून जवळ **जंजिरा किल्ला** आहे. या किल्ल्यांत जंजिरासंस्थानची गादी आहे. या संस्थानास जंजिरासंस्थान हें नांव याच किल्ल्यावरून पडलें आहे. याचा एकंदर प्रदेश ३२४ चौ० मैल आहे. त्याचें उत्पन्न सुमारें सात लक्ष रुपये व लोकसंख्या अंदाजें ८७॥ हजार आहे. **भात**, नाचणी, वरी, लाकूड, **नारळ** व **सुपारी** हीं एथील मुख्य पिकें आहेत. **श्रीवर्धनी रोठा नांवाची प्रसिद्ध सुपारी** याच संस्थानांत होते.

विभाग—**मुरूड, श्रीवर्धन** व **म्हसळें** असे तीन तालुके या संस्थानांत आहेत. त्यांचे **उत्तरभाग** व **दक्षिणभाग** असे दोन भाग केले आहेत. मुरूड तालुका उत्तरभागांत व बाकीचे दोन तालुके दक्षिणभागांत आहेत.

मर्यादा—या नकाशाकडे पाहा. याच्या उत्तरेस--रेवदंड्याची

खाडी, पूर्वेस--रोहें व माणगांव हे दोन तालुके, दक्षिणेस—बाणकोटची खाडी (सावित्री नदी), व पश्चिमेस—अरबी समुद्र आहे.

नद्या—मुरूड तालुक्यांत **शिघ्र्याची नदी**, श्रीवर्धन तालुक्यांत **चिखलपची** व म्हसळें तालुक्यांत **जानसई** या मोठ्या नद्या आहेत. या पूर्वेकडील डोंगरांत उगम पावतात. पैकीं शिघ्र्याची व चिखलपची या दोन अरबी समुद्रास मिळतात, आणि जानसई ही राजपूरच्या खाडीस मिळते.

डोंगर—सर्व भाग डोंगराळ आहे. त्यांत श्रीवर्धन तालुक्यांत **मदगड** हा मोठा डोंगर आहे.

जंजिरा संस्थान (विशेष वर्णन)

गांवें— (तालुका मुरूड) **मुरूड**—हें या संस्थानांतील मुख्य शहर आहे. सर्व मुख्य कचेऱ्या एथेंच आहेत. बागायती गांव. मराठी, इंग्रजी व उर्दू शिक्षणाची सोय एथें चांगली आहे. एथें शंकराचें प्रसिद्ध देवस्थान आहे. त्यास भोगेश्वर म्हणतात. **फुलशहर**—एथें राजवाडा आहे. या संस्थानचे नबाबसाहेब एथेंच राहातात. **खोकरी**—एथील तीन घुमट पाहाण्यासारखे आहेत.

(तालुका श्रीवर्धन) **श्रीवर्धन**—हें या तालुक्याचें मुख्य शहर आहे. एथें या तालुक्यांतील मुख्य कचेऱ्या आहेत. बाळाजी विश्वनाथ पेशवे यांचा जन्म एथेंच झाला. **दांडगुरी**—उत्तम हवेचें ठिकाण. नबाबसाहेब पूर्वी एथें हवा खाण्याकरितां जात असत. **वाकलघर**—गंगेचें प्रसिद्ध ठिकाण. दर तीन वर्षांनीं एथें गंगा येते.

(तालुका म्हसळें) **म्हसळें**—हें या तालुक्याचें मुख्य ठिकाण. दर बुधवारी एथें बाजार भरत असल्यामुळें घाटावरील माल एथें

बराच येतो. एथील हवा चांगली आहे. **देवघर**—एथें शंकराचें प्रसिद्ध देवस्थान आहे.

किल्ले—जंजिरा व कासवेट हे जंजिरे किल्ले आहेत. जंजिरा किल्ल्यांत या संस्थानची गादी आहे. तेथील तोषिखाना व राजवाडा हीं पाहाण्यासारखीं आहेत.

मदगड—याच नांवाच्या डोंगरावर हा एक डोंगरी किल्ला आहे.

क्षेत्रें—हरेश्वर हें प्रसिद्ध क्षेत्र आहे. एथें कार्तिकी व आषाढी एकादशीस आणि महाशिवरात्रीस मोठी यात्रा भरते.

पोस्ट ऑफिसें— जंजिरा (मुरूड), श्रीवर्धन, बोर्ली, मांडलें, नांदगांव, दिघी, पंचतनबोर्ली, हरेश्वर, म्हसळें व वडवली.

अभ्यास—[१] या संस्थानांतील पिकें सांगा. [२] कारण ? [३] एथील हवामान सांगा. [४] कां ? [५] प्रसिद्ध क्षेत्रें सांगा.

व्याख्यांचें एकीकरण

दिशा—दिशा म्हणजे बाजू. मुख्य दिशा चार आहेत. (१) ज्या दिशेस सूर्य उगवतो ती **पूर्व**, (२) ज्या दिशेस सूर्य मावळतो ती **पश्चिम**, (३) पूर्वेला उजवा हात करून उभें राहिलें कीं समोर **उत्तर**, व (४) मागें **दक्षिण** दिशा समजावी. **उपदिशा**—दोन मुख्य दिशांमधील कोपऱ्यास **उपदिशा** म्हणतात. त्याही चार आहेत. (१) पूर्व व दक्षिण यांमधील कोपऱ्यांस **आग्नेय** म्हणतात. (२) दक्षिण व पश्चिम यांमधील कोपऱ्यास **नैर्ऋत्य**, (३) पश्चिम व उत्तर यांमधील कोपऱ्यास **वायव्य**, आणि (४) उत्तर व पूर्व यांमधील कोपऱ्यास **ईशान्य** म्हणतात. शिवाय **वरची बाजू** व **खालची बाजू** मिळून **एकंदर दहा दिशा आहेत.**

नकाशा—एकाद्या जागेची अगर प्रदेशाची काढिलेली जी आकृति तिला **नकाशा म्हणतात**. **नकाशाच्या दिशा**—नकाशा वाचतां येईल असा सरळ धरिला असतां त्याची वरची बाजू ती उत्तर, उजव्या हाताकडील पूर्व,खालची बाजू ती दक्षिण व डाव्या हाताकडील बाजू ती पश्चिम दिशा समजावी.

गांव, तालुका, जिल्हा—ज्या ठिकाणीं पुष्कळ मनुष्यें घरें बांधून राहतात त्या ठिकाणास **गांव** म्हणतात. (२) लहान गांवास **खेडें** व (३) मोठ्या गांवास **शहर** म्हणतात. (४) शें-सव्वाशें गांव मिळून जो एक भाग मामलेदाराच्या ताब्यांत असतो त्यास **तालुका** म्हणतात. (५) सातआठ तालुके मिळून जो भाग कलेक्टरच्या ताब्यांत असतो त्यास **जिल्हा** म्हणतात.

टेकडी, डोंगर, पर्वत, घाट—(१) जमिनीच्या उंचवट्यास **टेकडी**, म्हणतात. (२) टेकडी मोठी असल्यास तिला **डोंगर** म्हणतात. (३) डोंगर फार उंच व लांबपर्यंत पसरलेला असल्यास त्यास **पर्वत** म्हणतात.(४)डोंगर अगर **पर्वत** यांवरून पलीकडे जाण्यास जो रस्ता केलेला असतो त्यास **घाट** म्हणतात.

किल्ला—(१) शत्रूपासून त्रास होऊं नये म्हणून सभोवतीं मजबूत भिंत(तट) बांधून तयार केलेल्या जागेस **किल्ला** म्हणतात. (२) जमिनीवरील किल्ल्यास **भुईकोट** म्हणतात. (३) डोंगरावरील किल्ल्यास **डोंगरी किल्ला** अगर गड म्हणतात. आणि (४) पाण्यांतील किल्ल्यास **जंजिरा** म्हणतात.

नदी, खाडी, सरोवर, बेट—(१) उंच प्रदेशांतून निघून जमिनीकडे वाहत जाणारा जो पाण्याचा मोठा प्रवाह त्यास **नदी** म्ह (२) ती जेथून निघते त्या ठिकाणास **उगम** व (३) जेथें ती मिळते त्या ठिकाणास **मुख** म्हणतात. (४) दोन नद्या एकत्र मिळत ठिकाणास **संगम** म्हणतात. (५) समुद्राचें पाणी नदीच्या मुखांत जे जातें तितक्या नदीच्या भागास **खाडी** म्हणतात. (६) चोहोंबाजूला असून मध्यें पाणी असतें त्यास **तलाव** अगर **सरोवर** म्हणतात. (७) च बाजूला पाणी व मध्यें जमीन असल्यास तीस **बेट** म्हणतात.

संस्थान—लहानसें राज्य स्वतंत्र राजाच्या ताब्यांत असतें त्यास **संस** म्हणतात.

बंदर—समुद्राच्या कडेला गलबतें, बोटी वगैरे लावण्याचें जें सोईचें ठि त्यास **बंदर** म्हणतात.

लेणीं—डोंगरांच्या पोटांत दगड कोरून देवळें, मूर्ति वगैरे कामें के असतात त्यांस **कोरींव लेणीं** म्हणतात.

स्टेशन—उतारू लोक (अगर माल) जेथें गाडींत अगर बोटींत चढ व उतरतात त्या ठिकाणास **स्टेशन** म्हणतात.

समाप्त.